जा.क्र./नसका/स्थायी/CR- ११ /२०१६.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- २८.११.२०१६

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण -२ मधील नियम क्र. ३ (अ) अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र ३ (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक ३०.११.२०१६ रोजी सकाळी ११.००** वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.

प्रति, ______________________
**श्री/श्रीमती**
सदस्य / सदस्या, स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## विषय क्रं.०१

दिनांक १५.५.२०१६, १६.०६.२०१६, २०.०९.२०१६ रोजी ११.३० व १२.३० वाजता व दिनांक १५.१०.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

## विषय क्रं.०२

कार्यालयीन आदेश क्रं. आवि/औभां/९४०७/१६ दिनांक १०.१०.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या कस्तुरबा मातृसेवा केंद्र शिवाजीनगर दवाखाना येथे दि. १४.०७.१५ रोजी कै. डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंती निमित -हृदयरोग विकासाच्या दा. इसीजी, २-D Echo, बी.पी. इत्यादी आजारावर तपासणी व औषधी उपचार करण्यात आला आहे व तसेच कार्यालयीन पत्र क्रं. आवि/४४२०/१५ दि. ०३.०७.१५ नुसार प्राप्त अग्रीम रक्कम रु. २,००,०००/- मधुन सदर कार्यक्रम राबविण्यासाठी झालेल्या खर्चे समायोजन करण्याकरिता कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

यावर होणारा खर्च हा सालसन २०१६-१७ मनपा अंदाजपत्रकाच्या औषधी व शल्यचिकित्सा उपकरणे या लेखा शिर्षकातुन करण्यात यावा.

## विषय क्रं.०३

कार्यालयनी आदेश क्रं. आवि/औभां/१०९९९/१६ दिनांक १९.११.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नागरी हिवताप योजने अंतर्गत Mullapudi Enterprises Secunderabad यांचे कोटेशन दर प्राप्त दिनांक २५.१०.१६ अन्वये आळी व किटक नाशके औषधी Temephos ५०% खरेदीसाठी लागणारी एकूण रक्कम रुपये ८९,२५०/- च्या खर्चास महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ७३ क च्या अधिन राहुन प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते त्यावर होणारा खर्च हा सालसन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकाच्या संबंधीत लेखा शिर्षकातुन करण्यात यावा. सदरील आदेशाची नोंद घेणे बाबत.

## विषय क्रं.०४

नांदेड वाघाळा शहर महानगरकलिका हद्दीत **प्रभाग कं. ३६ वसरणी भागात आर.सी.सी. नाली व सी.सी. रस्ता करणेसाठी** स. सदस्य यांनीदिलेल्या पत्रान्वये मा. महापौर यांनी क्षेत्रीय कार्यालय क्रं. ड च्या बैठकीतदिलेल्या आदेशान्वये आवश्यक बाबींचा समावेश करुनजिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये २,२०,९२८/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **एन.एन. भालेराव कंत्राटदार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाचीनिकड व तातडी लक्षात घेता सदरचे कामविनाविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर एन.एन. भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपय २,२०,९२८/- यास महाराष्ट्र महानगरलिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

## विषय क्रं.०५

नांदेड वाघाळा शहर महानगरकलिका हद्दीत **प्रभाग कं. १५ शिवाजीनगर भागात किरकोळ दुरुस्ती करण्यासाठी** या भागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन शिवाजीनगर येथील अंतर्गत रस्त्यालगत असलेली नाली उघडी असून सदर भागात मा. आमदार व मा. खासदार यांची निवासस्थापने असल्याने रस्त्याच्या दुतर्फी असलेल्या नाल्यांना उतार व्यवस्थीत नसल्याने नाली दुरुस्ती करणे व त्यावर स्लॅब टाकणे आवश्यक होते. सदर कामासाठी आवश्क बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ९,२१,७००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **पठाण मोईल अहेमद खान कंत्राटदार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाचीनिकड व तातडी लक्षात घेता सदरचे कामविनाविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपय ९,२१,७००/- यास महाराष्ट्र महानगरलिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

## विषय क्रं.०६

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/कोंडवाडा/१०४१७/१६ दिनांक ०३.११.२०१६ अन्वये **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड कोंडवाडा विभागात गोकूळनगर येथे ०१ व सिडको येथे ०१ असे एकूण ०२ कोंडवाडे आहेत**.

कोंडवाडा विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे मोकाट जनावरे पकडण्यासाठी चार वेळा निविदा काढण्यात आली होती. निविदास प्रतिसाद मिळालेला नाही सध्या नवरात्रोत्सव, दसरा, मोहर व दिवाळी इत्यादी असल्यामुळे मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत / बसत आहेत त्यामुळे रहदारीस अडथळा होत असून त्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहे.

रात्रीच्या वेळी मोकाट जनावरे पकडण्यासाठी दिनांक १०.१०.२०१६ ते २४.१०.२९१६ पर्यंत (१५ दिवसांसाठी) सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत १ टाटा एस खाजगी वाहन व १० कंत्राटी मजुर लावणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांच्या दरानुसार खाजगी वाहन (ड्रायव्हर व डिझेलसह) टाटा एस प्रतिदिन रुपये १,०००/- या प्रमाणे १५ दिवसांचे १५,०००/- व खाजगी मजुर लावण्यासाठी शासन परिपत्र क्रं. संकीर्ण २००१६/प्र.क्र.२४/नवि-२० मुंबई दिनांक २२ जानेवारी २०१७ च्या परिपत्रकामध्ये नमुद दर प्रेतिमहा रुपये ११,५००/- या प्रमाणे प्रतिदिन प्रती मजुर रुपये ३८४/- प्रमाणे एकूण १० मजुरांचे १५ दिवसांचे एकूण रुपये ५७,६००/- व टाटा एस चे १५,०००/- असे एकूण ७२,६००/- (अक्षरी रुपये बाहात्तर हजार सहाशे रुपये) आठवडयाला मजुरांची मजुरी व खाजगी वाहनास देयक देण्यासाठी श्री किशोर देरमाळे वरिष्ठ लिपीक कोंडवाडा विभाग यांच्या नावे अग्रीम रुपये ७२,६००/- देण्यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ७३ नुसार प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्च सालसन २०१६-१७ च्या महानगरपालिका अंदाजपत्रकातील संबंधीत लेखाशिर्षकातुन करण्यात यावा.

## विषय क्रं.०७

गणेश विसर्जन २०१६ निमित्त प्रतिवर्षा प्रमाणे गोदावरी नदीच्या विधि घाटावर विसर्जन शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी जिवरक्षकांची आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत नेमणुक करण्यात येते. दिनांक १५.०९.१६ रोजीचा गणेश विसर्जन कार्यक्रमात शिस्तबध्दता, निटनेटकेपणा येण्यासाठी जिवरक्षकांना जिवरक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अशा आशयाचे व मनपा लोगो छापलेले एकूण २६० टि शर्ट (एकूण रु. ३७,७८५/-) उपलब्ध करॅन देण्यात आलेले होते.

तरी उक्त प्रमाणे गणेश विसर्जन २०१६ निमित्त जिवरक्षकांना टी शर्ट उपलब्ध करुन देण्यासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मान्यता आवश्यक असल्याने त्यास मनपा स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

## विषय क्रं.०८

कार्यालयनी आदेश क्रं. आवि/औभां/११०००/१६ दिनांक १९.११.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नागरी हिवताप योजने अंतर्गत सहसंचालक आरोग्य सेवा सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक १९.०३.१६ अन्वये आळी व किटक नाशके औषधी Cyphenothrin ५०% EC खरेदीसाठी लागणारी एकूण रक्कम रुपये १,१५,०००/- च्या खर्चास महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ७३ क च्या अधिन राहुन प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते त्यावर होणारा खर्च हा सालसन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकाच्या संबंधीत लेखा शिर्ष्जकातुन करण्यात यावा. सदरील आदेशाची नोंद घेणे बाबत.

## विषय क्रं.०९

गोदवरी नदीच्या विविध घाटावर दिनांक १५.०९.२०१६ रोजी गणेश विसर्जन शांततेत पुर्ण झाले पण सदर दिवशी दिवसभर व रात्रीसुध्दा नांदेड शहरात सर्वत्र पाऊस चालु होता विष्णुपूरी धरणाचे कांही दरवाजे सोडल्याणे गोदावरी नदीच्या पात्रात वाढ झाली त्यामुळे तराफयाव्दारे मुर्ती जास्त लांब पाण्याच्या प्रवाहात सोडता येत नव्हत्या परिणामी विर्सजनाच्या दुस-या दिवशी व पाण्याचा प्रवाह आणि विष्णुपूरी धरणाचे दरवाजे बंद झाल्यानंतर पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे दोन्ही नदीच्या घाटावर गणेश मुर्ती उघडया पडल्यामुळे सदर मुर्तीना पुन्हा पाण्यात टाकण्यासाठी दि. १६.०९.१६ रोजी विविध गोदावरी जिवरक्षक सेवाभावी संस्था गंगापुत्र जिवरक्षक दल महागोदावरी जिवरक्षक दल व सेवाभावी संस्था आणि गुगापुत्र मच्छिमार सह संस्था या चार जिवरक्षक सेवाभावी संस्थाचे एकूण १४४ जिवरक्षक व १२ तराफे (एकूण रक्कम ६६,०००/- रुपये) मौखिक आदेशाव्दारे

लावण्यात आले होते त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे. उक्त प्रमाणे जिवरक्षक संस्थाचे देयक अदा करण्यासाठीच्या मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

## विषय क्रं.१०

**नांदेड वाघाळा शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत टंचाई काळामध्ये काळेश्वर पंप हाउस मधील मृत पाणीसाठी जॅकवेल पर्यंत आणण्या करिता नाल्याव्दारे नाळेश्वर मेन कॅनॉल ते गोदावरी नदीपर्यंत नाला खोदुन मा. जिल्हाधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे सदरील काम तातडीचे व आवश्क असल्यामुळे पोकलेन मशीनव्दारे मे. साहेल कन्सट्रक्शन ॅनड स्टिल वकर्स यांचे कडून दिनांक ०३.०६.२०१६ ते १९.०६.२०१६ पर्यंत एकूण २७२ तास काम करुन घेण्यात आले.**

सदरील मेकानिकल दर महाराष्ट्र शासनाच्या (Water Resources Department) च्या सालसन २०१४-१५ च्या जिल्हा दर सुचीनुसार रुपये १५५९/- प्रमाणे एकूण २७२ तास काम करुन घेण्यात आले यावरील होणार खर्च **रुपये ४,२४,०४८/-** यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यते करिता व मे. साहेल कन्सट्रक्शन ॅन्ड स्टिल वकर्स कडून काम करुन घेतल्याची मान्यते करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर तसेच यावरील होणारा खर्च पाणी टंचाई अंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीतुन खर्च करण्यास मान्यते करिता सादर.

## विषय क्रं.११

**नांदेड शहरात व मराठवाडयात सर्वत्र दिनांक २४ ते २६ सप्टेबर २०१६ पर्यंत सतत पाऊस झाल्याने गोदावरी नदीला पुर आलेला होता.** व विष्णुपूरी धरणाचे व वरच्या भागातील धरणाचे पाणी सोडल्याने पाच ते दहा गेट उघडावे लागले त्यामुळे शहरातील नावघाट, वसरणी, शनीमंदीर, इत्यादी नदीच्या काठावरील वस्त्यामध्ये पाणी शिरलेले होते पुरात अडकलेल्या नागरीकांना सुरक्षीत बाहेर काढण्यासाठी व नदीकाठावरील पुलावर व नदीजवळ नागरीकांना जाण्यापासुन मज्जाव करण्यासाठी जिवरक्षक लावणे आवश्यक होते त्यामुळे **दिनांक २४ ते २६ सप्टेंबर २०१६ या काळात गोदावरी नदीच्या विविध घाटावर व पुलावर प्रतिदिवस ८० जिवरक्षक ०५ तराफे प्रति जिवरक्षक २५०/- रुपये व प्रति तराफा २५००/- रुपये प्रमाणे एकूण देयक रक्कम रुपये ९७,५००/- गोदावरी जिवरक्षक सेवाभावी संस्थेचे लावण्यात आले होते.**

तरी उक्त प्रमाणे जिवरक्षक संस्थांचे देयक अदा करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर मान्यतेस्तव सादर.

## विषय क्रं.१२

नांदेड वाघाळा शहर मनपा हद्दीत **मनपा मुख्य प्रशासकिय इमारती मधील मा. विरोधी पक्ष नेता यांच्या कक्षा मध्ये** Toilet / Bathroom **चे काम करणे** तसेच इतर इमारती मधील दुरुस्तीचे कामे करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसूची २०१५-१६ नुसार **रुपये ९९,५८४/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. कृष्णा उत्तरवार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. कृष्णा उत्तरवार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ९९,५८४/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समितीसमोर सादर.

## विषय क्रं.१३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठयासाठी विष्णुपूरी जलाशयातुन पाणी उपसा करण्यात येतो या वर्षी टंचाई काळात विष्णुपूरी प्रकल्पातील जलाशयाची पाणी पातळी मृतसाठयाच्या खाली गेली होती. शहरात पाणीपुरवठा करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे जलशयात उपलब्ध असलेला पाणी साठा उपयोगात घेण्यासाठी नदीपात्रात चर मारुन काळेश्वर तसेच कोटीतिर्थ पंपींग स्टेशन या ठिकाणी पोकलेन मशीन २४ तास उपलब्ध ठेवणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळे तत्कालीन वेळी मा. जिल्हाधिकारी तथा मा. आयुक्त यांनी शहरास पाणी पुरवठयात खंड पडू नये व नागरिकांना उपलब्ध पाणी योग्य रित्या पुरवठा करण्याच्या सुचना दिल्या होत्या. सदर काम तात्काळ व युध्दपातळीवर करण्यासाठी तिन कंत्राटदारास भ्रमणध्वनीवर विचार केली असता मे. साहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड यांचे दर कमी होते. त्यामुळे पोकलेन मशीनचे कंत्राटदार सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड यांना आदेश देऊन कामास सुरुवात केली सदर कंत्राटदाराने Water Resources Department Mechnical Organisation यांच्या मंजुर दराने म्हणजेच रुपये १५५९/- प्रतितास या दराने काम केले व शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी पपिंग स्टेशनला पाणी कमी पडणार नाही याची दक्षता घेतली.

कामाची तातडी व निकष लक्षात घेऊन सदरील कामावर झालेला खर्च रुपये ५,४२,१६०/- इतका झालेला आहे सदरील खर्चास मनपा टंचाई अंतर्गत सालसन २०१६-१७ या वर्षातील करण्यात आलेल्या तरतुदीतुन खर्च करण्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. १४** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्दीत दारिद्रय रेषेखालील येणा-या नागरीकांना घरकुलासाठी मागविण्यात आलेल्या अर्जांची एकूण संख्या किती त्यापैकी किती नागरीक पात्र झाले व अपात्र किती पात्र नागरीकांना किती नागरीकांना घरकुल बांधण्यात आले त्यावर एकूण झालेला खर्च किती तसेच पात्र झालेल्या नागरीकांचे सर्वेक्षण करुन यादी प्रसिध्द केलेली आहे ते बरोबर आहेत काय याची सविस्तर माहितीर सभागृहात देवुन त्यावर निर्णय घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक :- उमेश चव्हाण अनुमोदक :- इशरत फातेमा अ. शमीम

**विषय क्रं.१५** **अपिल विनंती अर्ज** **दिनांक १८.०८.२०१६**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
नावाशमनपा नांदेड

**विषय** :- <u>माझा २९ महिणे ०५ दिवसाचा थकीत पगार मिळणे बाबत</u>

वरील विषय विनंती करण्यात येते की माझा थकीत पगार दिनांक ०१.०३.२००२ ते ०५.१०.२००३ पर्यंतचा एकूण (१९ महिणे ०५ दिवस) व दिनांक ०६.१०.२००३ ते १२.०८.२००४ पर्यंतचा एकूण (१० महिणे) असे एकूण २९ महिणे ०५ दिवसाची थकीत पगार आहे.

माझ्या मुलीचे लग्न असल्यामुळे मला पैशांची अत्यंत गरज आहे. तरी मे. साहेबांनी स्थायी समितीने माझ्या २९ महिणे ०५ दिवसाचा थकीत पगार मंजुर करुन मिळवुन दयावा हि नम्र विनंती.

स्वाक्षरीत/-
**डी.एन. बारडकर**
लिपीक आपत्ती व्यवस्थापन विभाग मनपा नांदेड

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

श्री डी.एन. बारडक चौकीदार मनपा नांदेड यांचा दिनांक ०१.०३.२००२ ते ०५.१०.२००३ पर्यंतचा एकूण १९ महिणे ५ दिवस व दिनांक ०६.१०.२००३ ते १२.०८.२००४ पर्यंतचा एकूण १० महिणे असे एकूण २९ महिणे ०५ दिवसाची थकीत पगार देण्याबाबत चे अपिल प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

तथापि कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-६/६४८७/२००४ दिनांक १३.०८.२००४ अन्वये संबंधीत हे अनाधिकृतपणे गैरहजर राहुन दिनांक ०१.०३.२००२ ते ०५.१०.२००३ पर्यंत वैद्यकिय प्रमाणपत्रासह वैद्यकिय कारणास्तव रजा मंजुर करणे बाबत त्यांनी अर्ज सादर केल्यानुसार वैद्यकिय प्रमाणपत्रात नमुद असलेल्या कारणास्तव ते आजारी हाते काय या बाबत त्याची वैद्यकिय मंडळ शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय पाठविण्यात आले होते वैद्यकिय मंडळाने त्यांचे पत्र क्रं १०४०४/दिनांक ०९.१२.२००३ अन्वये संबंधीतांची दिनांक ०१.०३.२००२ ते ०५.१०.२००३ या कालावधीची एकूण १९ महिणे ०५ दिवस वैद्यकिय कारणास्तवची रजा अवैतनिक रजा म्हणुन मंजुर करण्यात आलेली आहे व संबंधीतास अनाधिकृतपणे गैरहजर राहुन रजा उपभोगण्याच्या कारणास्तव विभागीय चौकशीच्या अधिन राहुन अंतीम संधी देवुन मुख्य कार्यालयात चौकीदार या पदावर मुख्य कार्यालयात सेवेत रुजु होण्याची परवानगी देवुन यापुढे उक्त प्रमाणे गैर वर्तणुक केल्याचे निदर्शनास आल्यास शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल अशी ताकीद देण्यात आलेली होती परंतु ते दिनांक ०६.१०.२००३ ते १२.०८.२००४ पर्यंत एकूण १० महिणे असे एकूण २९ महिणे ०५ दिवस अनुपस्थित असल्यामुळे संबंधीतांची वेतन अदाई झालेली नाही.

करिता संबंधीतांची उक्त कालावधीची अवैतनिक रजा व अनुपस्थिती असल्यामुळे वेतन अदाई करता येणार नाही ही बाब स्थायी समितीच्या निदर्शणास आणून द्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**सभापाती**
स्थायी समिती
नावाशमनपा नांदेड